राज्य रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या धडक सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत पुनर्जिवित विहीरींपैकी शिल्लक/सुरू न होऊ शकणाऱ्या विहीरी पूर्ण करण्यास व योजनेस मुदतवाढ देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
**शासन निर्णय क्रमांक : विहिर-२०१७/प्र.क्र.५१/मग्रारो-५**

१६ वा मजला, नविन प्रशासकीय भवन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक :- ०७ नोव्हेंबर, २०१९.

वाचा :-

१. शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांकः धविका-२००९/प्र.क्र.३६०/रोहयो-५, दिनांक २३ मार्च, २०११
२. शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांकः योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २३ जानेवारी, २०१४
३. शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक: योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २ जुलै, २०१४.
४. शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांकः योजना-२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २२ डिसेंबर, २०१४
५. शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांकः योजना -२०१३/प्र.क्र.१२३/रोहयो-५, दिनांक २९ जुलै, २०१५.
६. शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक: योजना -२०१५/प्र.क्र.२८(३)/रोहयो-५, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१५.
७. शासन निर्णय नियोजन विभाग क्रमांक: योजना -२०१५/प्र.क्र.२८(३)/रोहयो-५, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१६.
८. शासन परिपत्रक नियोजन विभाग क्रमांक : योजना-२०१५/प्र.क्र.२८(३)/रोहयो-५, दिनांक ७ नोव्हेंबर,२०१७
९. शासन परिपत्रक नियोजन विभाग क्रमांक : धडक-२०१६/प्र.क्र.५/रोहयो-५, दिनांक २२ डिसेंबर, २०१७

**प्रस्तावना-**

राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत धडक सिंचन विहिर अपूर्ण स्वरुपात असलेल्या जवाहर विहीरी, धडक सिंचन विहीरी, नरेगातून धडक सिंचन योजनेत परत घेण्यात आलेल्या विहीरी व रद्द केलेल्या पैकी पून्हा सुरू करावयाच्या धडक सिंचन विहीरी दिनांक ३० जून, २०१८ पर्यंत पूर्ण करण्यास वाचा येथे ७ मध्ये नमूद दिनांक ७ नोव्हेंबर, २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये मुदतवाढ देण्यात आली होती.

दरम्यान धडक सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत पुनर्जिवित ८००७ विहीरीपैकी रद्द विहीरी पुन्हा पुनर्जिवित करुन त्या पूर्ण करण्यासाठी नव्याने लाभार्थी निवड न करता जुन्याच लाभार्थ्यांकरिता योजना राबविण्याची मागणी लोकप्रतिनिधीकडून करण्यात आली होती. यांसदर्भात विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडून दिनांक ७.६.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे धडक सिंचन

विहिर कार्यक्रमांतर्गत पुनर्जिवित ८००७ विहिरीपैकी २९८५ इतक्या रद्द विहीरी पुन्हा पुनर्जिवित करण्याची बाब शासनास विचाराधीन होती. त्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय-**

धडक सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत दिनांक २७.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये पुनर्जिवित करण्यात आलेल्या ८००७ विहीरींपैकी रद्द विहिरी करण्यात आलेल्या २९८५ विहीरी पून्हा पुनर्जिवित करुन पूर्ण करण्यास खालील अटीं व शर्तींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | जिल्हा | पुनर्जिवित ८००७ विहिरीपैकी रद्द विहिरी | रद्द विहिरींपैकी पुन्हा पुनर्जिवित करावयाच्या विहिरींसाठी मंजूर लक्षांक |
|---|---|---|---|
| १ | अमरावती | १८२ | १८२ |
| २ | अकोला | ६६ | ६६ |
| ३ | बुलढाणा | ९८० | ९८० |
| ४ | यवतमाळ | १३ | १३ |
| ५ | वाशिम | २२० | २२० |
| ६ | वर्धा | १५२४ | १५२४ |
| **एकूण** | | **२९८५** | **२९८५** |

**अटी व शर्ती-**

१. विभागाच्या दिनांक २३.३.२०११ च्या शासन निर्णयान्वये गठित करण्यात आलेल्या मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीस दिनांक ३०.०६.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार सदर समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील रद्द परंतू पुनर्जिवित करावयाच्या विहिरी जुन्याच लाभार्थ्यांकडून पूर्ण करण्यासाठी संबंधित जिल्ह्याच्या मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत करण्यात यावी. सदर समितीस दिनांक ३१.३.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. निवड झालेल्या ज्या लाभार्थ्यांना पुनर्जिवीत विहिरी घ्यावयाच्या नसतील/ पूर्ण होण्यासारख्या नसतील त्यांच्याकडून लेखी निवेदन घेऊन अथवा पंचनामा करुन त्या विहिरी रद्द करण्याची कार्यवाही यंत्रणेकडून करण्यात यावी.

३. धडक सिंचन विहिरी कार्यक्रमास दिनांक ३०.६.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढ संपुष्टात आली असल्याने, सदर योजनेस दिनांक ३०.६.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

४. आतापर्यंत योजनेत पूर्ण झालेल्या ४७,०९१ विहिरींची सद्य:स्थिती, त्यापैकी किती विहिरींचा वापर सुरु आहे, त्यांच्यामुळे सिंचनात किती वाढ झाली इत्यादी बाबी स्पष्ट होण्यासाइी सदर कार्यक्रमाचे त्रयस्थ यंत्रणेकडून लेखापरिक्षण करुन घेण्याची कार्यवाही विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडून करण्यात यावी.

५. सदर योजनेंतर्गत निवड झालेल्या लाभार्थ्यांची आधार क्रमांकाशी जोडणी करुन त्यानंतर लाभार्थ्यांना अनुदानाची रक्कम वितरीत करण्याबाबत कार्यपध्दतीत सुधारणा करण्याची दक्षता संबंधित यंत्रणेकडून करण्यात यावी.

६. पुनर्जिवित विहिरी खोदण्यासाठी जिल्हास्तरीय समितीने यापूर्वी निवडलेल्या लाभार्थ्यांची विहिरींची कामे सुरु करताना यंत्रणेने राज्य भूजल प्राधिकरणाने नेमलेल्या पाणलोट क्षेत्र जलसंपत्ती समितीशी समन्वय ठेवणे आवश्यक राहील.

७. नियोजन विभागाच्या संदर्भाधीन अ.क्र. ६ येथे नमूद दिनांक **२७.११.२०१५** च्या शासन निर्णयामधील व अ.क्र. ८ येथे नमूद **दिनांक ७.११.२०१७ च्या परिपत्रकातील** सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

८. धडक सिंचन विहीर योजनेतील उपरोक्त विहीरी पूर्ण करण्या संदर्भात वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय/परिपत्रक यामधील अटी/शर्ती लागू राहतील.

२. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाच्या मान्यतेने व वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २३३/२०१८/व्यय-८, दिनांक १३.०८.२०१८ अन्वये देण्यात आलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०९१९२२२८०८१३१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pramod Sopan Shinde

Digitally signed by Pramod Sopan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Planning Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=86df3b89584863ae114ab9dcc19318acf0e1e94714d4f3f2196a35403313b298, serialNumber=562c0254268b830ae4a70ddb0c9df502ae456e874b1b21fe99aa62374414009a, cn=Pramod Sopan Shinde
Date: 2019.11.08 12:38:27 +05'30'

**( डॉ. प्रमोद शिंदे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१ मा. राज्यपालांचे सचिव.
२ मा. मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२.
३ सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव.
४ सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

५ मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.

६ सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव.

७ विभागीय आयुक्त, अमरावती/नागपूर.

८ जिल्हाधिकारी अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.

९ उपजिल्हाधिकारी (रोहयो) अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.

१० मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.

११ कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग, जिल्हा परीषद, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा.

१२ मा. सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

१३ उप सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१४ सहाय्यक संचालक (लेखा), रोहयो-७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१५ सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी (रोहयो प्रभाग)/ निवड नस्ती रोहयो-५.